# कार्यावली

**गुरुवार, दिनांक १८ मार्च, २०१० रोजी दुपारी १.०० वाजता मुंबई येथील विधान भवनात सुरु होणाऱ्या महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१० च्या प्रथम अधिवेशनाची कार्यावली.**

**एक** : राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत सभागृहासमोर ठेवणे.

**दोन** : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव.

**तीन** : सभापतींनी, सभापती तालिकेवर सदस्य नामनिर्देशित करणे.

**चार** : प्रश्नोत्तरे.

**पाच** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

**सहा** : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा.

**सात** : सन २००९-२०१० च्या पुरवणी मागण्या सादर करणे व त्यावर चर्चा करणे.

**आठ** : सन २०१०-२०११ चा अर्थसंकल्प सादर करणे व त्यावर चर्चा करणे.

**नऊ** : विधानपरिषद नियम समितीचा अहवाल सादर करणे.

**दहा** : मंत्र्यांनी कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

**अकरा** : **शासकीय विधेयके.**
विचार, खंडशः विचार व संमत करणे.

१) सन २००९ चे विधानसभा विधेयक क्रमांक १७ - मुंबई करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक, २००९.

२) सन २००९ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र राज्य विशेष सुरक्षा महामंडळ विधेयक, २००९.

**बारा** : शोक प्रस्ताव.

**तेरा** : इतर शासकीय कामकाज ज्याची सूचना नंतर देण्यात येईल.

**चौदा** : तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर अल्पकालीन चर्चा-नियम ९७ अन्वये.

**पंधरा** : तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे मंत्र्यांचे लक्ष वेधणे-नियम १०१ अन्वये.

**सोळा** : अनियत-दिन-प्रस्ताव (म.वि.प. नियम २६२ अन्वये) सूची स्वतंत्रपणे वितरित करण्यात येईल.

**सतरा** : अशासकीय विधेयके.

**अठरा** : अशासकीय ठराव (म.वि.प. नियम १०२ अन्वये).

**श्री. रामनाथ मोते यांचा ठराव क्रमांक १,२,३**

(१) '' राज्यातील सर्व न्यायालयांचे कामकाज १०० टक्के मराठी भाषेतून होण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(२) '' राज्यातील दूरदर्शन तसेच केबल नेटवर्कद्वारा प्रसारित होणाऱ्या विविध चॅनेलद्वारा अश्लील व हिंसाचारी चित्रपट, जाहिराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जातात, परिणामी तरुणपिढीवर व बालमनावर त्यांचे होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या सर्व वाहिन्यांवरील अश्लील कार्यक्रमांवर बंदी घालावी यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३) '' राज्यातील शिक्षण क्षेत्रात वाढत चाललेल्या भ्रष्टाचाराला व गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी शासनाने त्वरीत उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री. जयंत पाटील यांचा ठराव क्रमांक ४,५,६,७,८**

(४) '' राज्यातील जीवनावश्यक वस्तुंच्या बेसुमार वाढत असलेल्या किंमती, त्यावर नियंत्रण ठेवण्यात शासनाला आलेले अपयश, ऐन सणासुदीच्या वेळी बाजारात जीवनावश्यक वस्तुंचा कृत्रिम तुटवडा निर्माण करुन त्या वस्तुंची बेसुमार भाववाढ करण्याची व्यापारी वर्गात निर्माण झालेली प्रवृत्ती, सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानात जीवनावश्यक वस्तुंचा निर्माण झालेला तुटवडा, त्यामुळे जनतेवर पडत असलेला आर्थिक ताण, या सर्व गोष्टींचा सर्वंकष विचार करुन जीवनावश्यक वस्तुंचे योग्य व स्वस्त दराने वितरण करण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक बळकट करुन स्थिर भाव योजना आखावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५) "कोकणातील विशेषतः रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग व ठाणे या चार जिल्हयांसाठी एक स्वतंत्र मत्स्य विद्यापीठ स्थापन करुन त्यात मत्स्यव्यवसायासंबंधी विविध अभ्यासक्रम अंतर्भूत करावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६) ''राज्यातील सर्व गावे बारमाही वाहतूकीस योग्य व्हावीत याकरिता सर्व ग्रामीण भागातील रस्त्यांची पाहणी करुन आवश्यक असेल तेथे नद्या, नाले व मोऱ्या यांचेवर पूल बांधण्याची धडक योजना अंमलात आणावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७) '' राज्यात किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्याबाबत तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देऊन या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८) '' राज्यात कायदा व सुव्यवस्थेची दिवसेंदिवस ढासळत चाललेली परिस्थिती, तसेच पोलिसांना गुन्हा शोधून काढण्यात येत असलेले अपयश, वाढत्या गुन्हेगारीमुळे जनतेत निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना विचारात घेता, या संदर्भात अभ्यास करुन निश्चित उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सदनातील सदस्यांची एक उच्चस्तरीय समिती स्थापन करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

**श्री.केशवराव मानकर यांचा ठराव क्रमांक ९,१०,११,१२,१३**

(९) '' राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१०) '' ग्रामीण महिलांकरिता स्वच्छता गृहाची सोय होण्याच्या दृष्टीने प्रत्येक गावात महिलांसाठी किमान प्रत्येक वार्डामध्ये एक स्वतंत्र सुलभ शौचालये बांधण्यात यावीत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(११) '' राज्यातील सहकार क्षेत्रातील साखर कारखाने, सूतगिरण्या, मध्यवर्ती बँका, खरेदी विक्री संघ, ॲपेक्स मार्केटिंग सोसायटया व शिखर बँका इ. संस्थांत राज्य शासनाने केलेली कोट्यावधी रुपयांची गुंतवणूक लक्षात घेता उपरोक्त संस्थांच्या प्रशासकीय व आर्थिक कारभारावर योग्य प्रकारचे नियंत्रण ठेवण्यासाठी "लोकलेखा" समितीच्या धर्तीवर दोन्ही सभागृहाची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१२) '' राज्यातील सर्व शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी कर्जे ४ टक्के व्याजाच्या दराने पुरविण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१३) '' राज्यात तालुक्याच्या ठिकाणी सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत, जेणेकरुन तालुक्याच्या ठिकाणी येणा-या ग्रामीण भागातील जनतेला त्यांच्या कामासाठी वेगवेगळया कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही, तसेच आर्थिक भुर्दंड सोसावा लागणार नाही, यासाठी शासनाने योजनाबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री. रामदास कदम यांचा ठराव क्रमांक १५,१६, १७**

(१५) " कोकणात सिंचनाच्या अपुऱ्या सोयी असल्यामुळे या भागातील शेतकरी वर्षानुवर्षे नापिकी आणि नुकसान सहन करीत असून अनेक सिंचनविषयक योजना/पाटबंधारे प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्यामुळे शेतकऱ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेवून कोकणाची सिंचनविषयक प्रगती होण्याच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणावर सिंचनाच्या सोयी उपलब्ध करण्यात याव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(१६) '' राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत चाललेली समस्या लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठयांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा, व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१७) '' मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची वेळीच दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात इमारती कोसळून जिवित व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरित्या पाहणी न करणे, तसेच इमारतींच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यातून मोठया प्रमाणात होत असलेला भ्रष्टाचार, त्यामुळे रहिवाशांत पसरलेला तीव्र असंतोष, या संदर्भात साकल्याने विचार करुन त्यावर परिणामकारक उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री. दिवाकर रावते यांचा ठराव क्रमांक २०,२१**

(२०) '' मुंबई शहरात रोज हजारोंच्या संख्येने येणारे परप्रांतीयांचे लोंढे, परिणामी मुंबई शहरातील कायदा व सुव्यवस्था बिघडून मोठया प्रमाणात निर्माण होणाऱ्या विविध समस्या लक्षात घेता मुंबई शहरात येणारे परप्रांतीयांचे

लोंढे रोखण्यासाठी शासनाने तातडीने कडक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२१) '' मुंबई व महाराष्ट्रामधील केंद्र शासनाच्या कार्यालयांतून केंद्र शासनाच्या त्रिभाषा सुत्रानुसार मराठी भाषेचा वापर पुरेशा प्रमाणात होत नाही हे लक्षात घेता, राज्यातील केंद्र शासनाच्या सर्व कार्यालयांमधून मराठी भाषेचा मोठया प्रमाणावर वापर करण्यासाठी विशेष उपाययोजना करावी, या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

## डॉ. दिपक सावंत यांचा ठराव क्रमांक २५

(२५) '' राज्यातील ग्लोबल वॉर्मिंग प्रश्नासाठी कोणतीही तज्ञांची समिती नसल्याने हवामानात वातावरणातील होणारे बदल तसेच मुंबई शहर हे समुद्र किनाऱ्यावर वसले असल्यामुळे व ७२० कि.मी. किनारा राज्याला लाभला असल्याने समुद्राच्या पातळीत होणारे बदल व वाढती लाटांची उंची, यावर सखोल अभ्यास करुन समिती स्थापन करावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

## श्री. अनिल परब यांचा ठराव क्रमांक २७,२८,२९,३०

(२७) '' वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात शासनातर्फे व महानगरपालिकांतर्फे रुग्णवाहिका सुरु न करणे, तसेच अपघात, नैसर्गिक आपत्ती किंवा आकस्मिक दुखणे, यामुळे सर्वसामान्य लोकांना रुग्णवाहिका सेवा तात्काळ उपलब्ध न होणे, त्यासाठी सामाजिक किंवा राजकीय संस्थांनी विभागा-विभागातून जनसेवेच्या उदात्त हेतूने रुग्णवाहिका सुरु केल्या आहेत, अशा रुग्णवाहिकांसाठी शासनातर्फे आर्थिक अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२८) '' राज्यात शासकीय व राजकीय स्तरावरील सतत वाढणारा भ्रष्टाचार रोखण्यास सध्याची यंत्रणा कुचकामी ठरते आहे हे लक्षात घेता, केंद्रीय दक्षता आयोगाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात "राज्य दक्षता आयोगाची" स्थापना करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२९) '' राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तिर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयी सुविधाही उपलब्ध करुन दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्या वेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांना मृत्यू येणे, यामध्ये अनेक जण गंभीर जखमी होणे, त्यामुळे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करण्याच्या दृष्टीने तशा योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनाला करीत आहे ''

(३०) '' राज्यातील महत्वाच्या शहरांमधील विशेषतः मुंबई, पुणे, औरंगाबाद शहरांमध्ये दिवसेंदिवस परप्रांतीय लोकांचे सातत्याने येणारे लोंढे, त्यामुळे स्थानिक जनतेच्या मुलभूत नागरी सुविधांवर पडणारा कमालीचा ताण, अशातच प्राथमिक स्वरुपाच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच वीज, पाणी, रस्ते, गटारे, वाहतूक इत्यादींची सोय करण्यासाठी केंद्र शासनाकडून राज्य शासनास पुरेसे आर्थिक सहाय्य उपलब्ध न होणे, परिणामी होणाऱ्या जाचातून स्थानिक जनतेची मुक्तता करुन त्यांचे नागरी जीवन सुसह्य होण्यासाठी व राज्याच्या अर्थव्यवस्थेचा समतोल राखण्यासाठी परप्रांतीयांचे लोंढे तातडीने रोखण्यासंदर्भात उपाययोजना करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

## श्रीमती उषाताई दराडे यांचा ठराव क्रमांक ३३,३४,३५

(३३) '' गॅट कराराच्या माध्यमातून खुली झालेली आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मात्र राज्यात पिकणाऱ्या फळांचा दर्जा गुणात्मकदृष्टया श्रेष्ठ आहे, हे विचारात घेता त्यांच्या निर्याती बाबत राज्य शासनाकडून ठोस सुविधा उपलब्ध करुन देण्याची निर्माण झालेली आवश्यकता लक्षात घेता याबाबत एक निश्चित स्वरुपाचा कार्यक्रम आखून त्याकरिता पुरेशी अर्थसंकल्पीय तरतूद करुन शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने या कार्यक्रमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३४) '' राज्यात दिवसेंदिवस जमिनीवरील व भूगर्भातील पाण्याची पातळी वेगाने कमी होत असल्याने व त्यातच पावसाचे प्रमाण देखील कमी होत असल्यामुळे पिण्याच्या पाण्याचा व शेतीच्या पाण्याचा दिवसेंदिवस ज्वलंत होत चाललेला प्रश्न लक्षात घेता जलसंधारणाचा कार्यक्रम प्रभावीरित्या राबविण्याच्या दृष्टीने शासनाने कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३५) '' राज्यातील अनेक ठिकाणी धरणासारख्या प्रकल्पांमध्ये ज्यांची घरे व जमिनी गेल्या आहेत, अशा प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम विनाविलंब व निश्चितपणे पूर्ण होऊ शकेल, या दृष्टीने कालबध्द कार्यक्रम आखण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

## प्रा. सुरेश नवले यांचा ठराव क्रमांक ३६, ३७,३८, ८३ व ८४

(३६) '' राष्ट्रीय स्तरावरील भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा राज्यस्तरावरील वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश परिक्षा, लोकसेवा आयोग व तत्सम स्पर्धात्मक परिक्षांमध्ये राष्ट्रीय स्तरावर उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने उमेदवारांची योग्य प्रकारे व अद्ययावत पध्दतीने पूर्वतयारी करुन घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३७) '' राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा दिवसेंदिवस खालावत चाललेला दर्जा लक्षात घेता या प्रकरणी आमूलाग्र सुधारणा करण्यासाठी शासनाने एक कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३८) '' राज्यातील विनाअनुदान तत्वावर मान्यता देऊन सुरु करण्यात आलेल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विना अनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८३) "राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(८४) " राज्यातील दूरदर्शन तसेच केबल नेटवर्कद्वारा प्रसारित होणाऱ्या विविध चॅनेलद्वारा अश्लील व हिंसाचारी चित्रपट, जाहिराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जातात, परिणामी तरुणपिढीवर व बालमनावर त्यांचे होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या सर्व वाहिन्यांवरील अश्लील कार्यक्रमांवर बंदी घालावी यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

## श्री. संजय दत्त यांचा ठराव क्रमांक ३९,४१,४२,४३

(३९) '' राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तिर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयी सुविधाही उपलब्ध करुन दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्या वेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांना मृत्यू येणे, यामध्ये अनेक जण गंभीर जखमी होणे, त्यामुळे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करण्याच्या दृष्टीने तशा योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनाला करीत आहे ''

(४१) '' राष्ट्रीय स्तरावरील भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा राज्यस्तरावरील वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश परिक्षा, लोकसेवा आयोग व तत्सम स्पर्धात्मक परिक्षांमध्ये राष्ट्रीय स्तरावर उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने उमेदवारांची योग्य प्रकारे व अद्ययावत पध्दतीने पूर्वतयारी करुन घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४२) '' राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करुन अध्ययन करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारिरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने हया विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४३) '' ठाणे जिल्हा हा दुर्गम, मोठ्या प्रमाणात आदिवासी व मागासलेला जिल्हा असून या जिल्ह्याचा विकास होण्याच्या दृष्टीने कल्याण-माळशेजघाट मार्गे अहमदनगर या नवीन रेल्वे मार्गाचे काम त्वरित मंजूर करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

## डॉ. निलम गोऱ्हे यांचा ठराव क्रमांक ४५, ४७ व ७७

(४५) "राज्यात निरनिराळया प्रकारची आमिषे दाखवून काही धर्माचे घर्म प्रचारक सर्वसामान्य आदिवासी, गरीब जनतेचे धर्मांतर करीत असल्याचे दिसून येते, अशा धर्मातरावर तात्काळ बंदी घालण्यासंदर्भात योग्य ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे."

(४७) "दूरचित्रवाणी वाहिन्यांवर प्रक्षेपित केले जाणारे अश्लिल व हिंसाचारी प्रक्षेपण व त्यामुळे समाजावर होणारे अनिष्ट परिणाम लक्षात घेता विविध दूरचित्रवाहिन्यांवरुन प्रक्षेपित केल्या जाणाऱ्या मालिका व अन्य कार्यक्रम, हे प्रक्षेपण योग्य आहेत किंवा नाही याबाबतची तपासणी करणारी चित्रपटांसाठी असणाऱ्या सेन्सॉर बोर्डाप्रमाणे तत्सम यंत्रणा स्थापन करुन त्या अन्वये दूरचित्रवाणी वाहिन्यांवरुन प्रक्षेपित होणाऱ्या सर्व कार्यक्रमांचे नियंत्रण करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७७) "राज्यातील कोयना धरण परिसरात सातत्याने बसत असलेले भूकंपाचे लहान मोठे धक्के अशा लहान मोठा भूकंपाच्या घक्क्यांची संख्या सुमारे दीड लाखांवर असल्याची नोंद कोयना बांधकाम प्रकल्पाच्या वूड अंडर्सन भूंकप मापक यंत्रावर होणे, सदर भूकंपाची मालिका अजूनही सुरु असणे, या भूकंपाचा केंद्रबिंदू कोयना धरण असणे सदर भूकंपाचा केंद्रबिंदू व त्यांची खोली याची अचूक माहिती तात्काळ उपलब्ध होण्यासाठी असणाऱ्या यंत्रणेतून तात्काळ माहिती मिळत नसल्याने या यंत्रणेवर प्रश्न चिन्ह निर्माण होणे भूकंप मापक यंत्रणा कुचकामी असणे, त्यामुळे आपत्ती व्यवस्थापनेला कुठल्याही प्रकारची वेळीच माहिती न मिळणे कोयना धरणाच्या परिसरात भविष्यात कधीही मोठया प्रकारचा भूकंप होण्याची शक्यता विचारात घेता व त्यातून होणारे मोठ्या प्रमाणावरील नुकसान टाळण्याकरीता कोयना प्रकल्प भूकंप मापक यंत्रणा आधुनिक तंत्रज्ञानाने प्रगत करुन तातडीने कार्यवाही करण्याबाबत बृहद् आराखडा तयार करुन भूकंपाबाबतचे सर्व प्रकारचे तंत्रज्ञान विकसित करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

## श्री.अरुण गुजराथी यांचा ठराव क्रमांक ४८,४९,५०,५१

(४८) '' खानदेशात सिंचनाच्या अपूर्ण सोयी असल्यामुळे या भागातील शेतकरी वर्षानुवर्षे नुकसान सहन करीत असून अनेक सिंचन विषयक योजना/पाटबंधारे प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्यामुळे शेतकऱ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन खानदेशातील सिंचनविषयक प्रगती होण्याचे दृष्टीने मोठया प्रमाणावर सिंचनाच्या सोयी उपलब्ध करण्यात याव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४९) '' राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत चाललेली समस्या लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठयांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा, व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५०) '' राज्यातील ग्रामीण भागातील सर्व खेडी नजिकच्या महामार्गांना डांबरी रस्त्याने जोडण्यासाठी शासनाने एक कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५१) '' राज्यात दिवसेंदिवस वनराईचे कमी होत असलेले प्रमाण, बेसुमार वृक्ष तोडीने होणारी जमिनीची धूप, पर्जन्यमानात झालेली घट, सिंचन व पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली समस्या, पर्यावरणाचा बिघडलेला समतोल इत्यादी बाब लक्षात घेता, त्यासाठी निश्चित स्वरुपाचा कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

## श्री. दिपकराव साळुंखे यांचा ठराव क्रमांक ५२,५३,५४,५५,५६

(५२) '' राज्यातील दूरदर्शन तसेच केबल नेटवर्कद्वारा प्रसारित होणाऱ्या विविध चॅनेलद्वारा अश्लील व हिंसाचारी चित्रपट, जाहिराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जातात, परिणामी तरुणपिढीवर व बालमनावर त्यांचे होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या सर्व वाहिन्यांवरील अश्लील कार्यक्रमांवर बंदी घालावी यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५३) '' राज्यात तालुक्याच्या ठिकाणी सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत, जेणेकरुन तालुक्याच्या ठिकाणी येणा-या ग्रामीण भागातील जनतेला त्यांच्या कामासाठी वेगवेगळ्या कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही, तसेच आर्थिक भुर्दंड सोसावा लागणार नाही, यासाठी शासनाने योजनाबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५४) '' राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५५) '' राज्यात किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्याबाबत तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देऊन या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५६) '' राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तिर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयी सुविधाही उपलब्ध करुन दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्या वेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांना मृत्यू येणे, यामध्ये अनेक जण गंभीर जखमी होणे, त्यामुळे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करण्याच्या दृष्टीने तशा योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे ''

## श्री.राजन तेली यांचा ठराव क्रमांक ५७,५८,५९,६०,६१

(५७) '' राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा दिवसेंदिवस खालावत चाललेला दर्जा लक्षात घेता या प्रकरणी आमूलाग्र सुधारणा करण्यासाठी शासनाने एक कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५८) '' कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील वरकस जमिनी पाण्याखाली आणण्यासाठी तसेच मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येच्या अनुषंगाने त्याचप्रमाणे शहरीकरणाच्या विकासाच्या दृष्टीने पाण्याची निर्माण होत असलेली समस्या सोडविण्यासाठी कोयना धरणाचे विजनिर्मितीनंतर वशिष्ठ नदीच्या (ता. चिपळूण, जि. रत्नागिरी) पात्रातून वाया जाणारे पाणी कोकणातील जिल्ह्यांना तसेच मुंबईसह ठाणे व नवी मुंबई या महानगरपालिकांच्या

पाण्याची समस्या/दुष्काळ दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने चिपळूण तालुक्यातील वशिष्ठ नदीतील पाणी परशुराम घाटाच्या पायथ्यापासून उचलून (लिफ्टिंग) निसर्गाच्या गुरत्वाकर्षणाच्या शक्तीने पूर्ण कोकण विभागाला पुरविण्याकरिता शासनाने एक खास कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरेने युध्दपातळीवर अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५९) '' कोकणातील भुभागापैकी सुमारे ५३.४५ टक्के पडित असलेल्या जमिनीत आंबा, काजू, सुपारी, कोकम, नारळ इ.फळांची लागवड आणि साग, शिसम, आईन, किंजळ, खैर इ.वृक्षांची वनराईची पध्दतशीर लागवड करण्याच्या दृष्टीने धडक कार्यक्रम हाती घेऊन या कार्यक्रमासाठी आर्थिक तरतूद व अन्य उपाययोजना करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६०) '' राष्ट्रीय स्तरावरील भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा राज्यस्तरावरील वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश परिक्षा, लोकसेवा आयोग व तत्सम स्पर्धात्मक परिक्षांमध्ये राष्ट्रीय स्तरावर उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने उमेदवारांची योग्य प्रकारे व अद्ययावत पध्दतीने पूर्वतयारी करुन घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६१) '' राज्यातील महत्वाच्या शहरांमधील विशेषतः मुंबई, पुणे, औरंगाबाद शहरांमध्ये दिवसेंदिवस परप्रांतीय लोकांचे सातत्याने येणारे लोंढे, त्यामुळे स्थानिक जनतेच्या मुलभूत नागरी सुविधांवर पडणारा कमालीचा ताण, अशातच प्राथमिक स्वरुपाच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच वीज, पाणी, रस्ते, गटारे, वाहतूक इत्यादींची सोय करण्यासाठी केंद्र शासनाकडून राज्य शासनास पुरेसे आर्थिक सहाय्य उपलब्ध न होणे, परिणामी होणाऱ्या जाचातून स्थानिक जनतेची मुक्तता करुन त्यांचे नागरी जीवन सुसह्य होण्यासाठी व राज्याच्या अर्थव्यवस्थेचा समतोल राखण्यासाठी परप्रांतीयांचे लोंढे तातडीने रोखण्यासंदर्भात उपाययोजना करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

## श्रीमती अलका देसाई यांचा ठराव क्रमांक ६२,६३,६४,६५,६६

(६२) '' राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तिर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयी सुविधाही उपलब्ध करुन दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्या वेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांना मृत्यू येणे, यामध्ये अनेक जण गंभीर जखमी होणे, त्यामुळे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करण्याच्या दृष्टीने तशा योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे ''

(६३) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच, संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६४) '' वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात शासनातर्फे व महानगरपालिकांतर्फे रुग्णवाहिका सुरु न करणे, तसेच अपघात, नैसर्गिक आपत्ती किंवा आकस्मिक दुखणे, यामुळे सर्वसामान्य लोकांना रुग्णवाहिका सेवा तात्काळ उपलब्ध न होणे, त्यासाठी सामाजिक किंवा राजकीय संस्थांनी विभागा-विभागातून जनसेवेच्या उदात्त हेतूने रुग्णवाहिका सुरु केल्या आहेत, अशा रुग्णवाहिकांसाठी शासनातर्फे आर्थिक अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६५) '' राज्यात विना अनुदानित अभियांत्रिकी, वैद्यकीय महाविद्यालयांना फी वाढीचे अधिकार सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने विनाअनुदानित अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयांच्या संचालकांनी फी मध्ये केलेली असमर्थनीय वाढ, सदर फी वाढीमुळे अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयांमधून शिक्षण घेणे गरीब, हुशार व होतकरु विद्यार्थ्यांच्या आर्थिक कुवतीबाहेरचे होणे, परिणामी त्यांना अशा महत्वाच्या शिक्षणाला मुकावे लागणे, ही वस्तुस्थिती लक्षात घेता अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयामधील फी भरण्यासाठी अशा हुशार व गुणवान विद्यार्थ्यांना त्यांचे शिक्षण पूर्ण

होईपर्यंत शासनाने आर्थिक सहाय्य कर्जरुपाने उपलब्ध करुन द्यावे व शिक्षण पूर्ण झाल्यावर सदरहू कर्ज हप्त्याहप्त्याने वसूल करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६६) '' राज्यात कायदा व सुव्यवस्थेची दिवसेंदिवस ढासळत चाललेली परिस्थिती, तसेच पोलिसांना गुन्हा शोधून काढण्यात येत असलेले अपयश, वाढत्या गुन्हेगारीमुळे ग्रामीण व शहरी जनतेत निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना विचारात घेता, या संदर्भात अभ्यास करुन निश्चित उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सदनातील सदस्यांची एक उच्चस्तरीय समिती स्थापन करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

## श्री.रमेश शेंडगे यांचा ठराव क्रमांक ६७,६८,६९,७०,७१

(६७) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच, संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६८) '' शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा वा महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत दिली जाते त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील पाल्यांना शाळा वा महाविद्यालयांमार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत देण्यांत यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६९) '' नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पीक विमा नुकसान भरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे. याला शंभर वर्षे जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारीत आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भुमिका घ्यावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." ''

(७०) '' राज्यातील जीवनावश्यक वस्तुंच्या बेसुमार वाढत असलेल्या किंमती, त्यावर नियंत्रण ठेवण्यात शासनाला आलेले अपयश, ऐन सणासुदीच्या वेळी बाजारात जीवनावश्यक वस्तुंचा कृत्रिम तुटवडा निर्माण करुन त्या वस्तुंची बेसुमार भाववाढ करण्याची व्यापारी वर्गात निर्माण झालेली प्रवृत्ती, सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानात जीवनावश्यक वस्तुंचा निर्माण झालेला तुटवडा, त्यामुळे जनतेवर पडत असलेला आर्थिक ताण, या सर्व गोष्टींचा सर्वंकष विचार करुन जीवनावश्यक वस्तुंचे योग्य व स्वस्त दराने वितरण करण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक बळकट करुन स्थिर भाव योजना आखावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७१) '' राज्यातील सहकार क्षेत्रातील साखर कारखाने, सूतगिरण्या, मध्यवर्ती बँका, खरेदी विक्री संघ, ॲपेक्स मार्केटिंग सोसायटया व शिखर बँका इ. संस्थांत राज्य शासनाने केलेली कोट्यावधी रुपयांची गुंतवणूक लक्षात घेता उपरोक्त संस्थांच्या प्रशासकीय व आर्थिक कारभारावर योग्य प्रकारचे नियंत्रण ठेवण्यासाठी "लोकलेखा" समितीच्या धर्तीवर दोन्ही सभागृहाची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

## श्रीमती मंदा म्हात्रे यांचा ठराव क्रमांक ७२,७३,७४,७५,७६

(७२) '' राज्यातील सर्व शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी कर्जे ४ टक्के व्याजाच्या दराने पुरविण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७३) '' कोकण रेल्वे मार्गावरील प्रवाशांची वाढती संख्या विचारात घेता हा मार्ग दुपदरी (सेंकड ट्रॅक) करण्याची आवश्यकता, तसेच या रेल्वेमार्गावरील प्रत्येक रेल्वे स्थानकावर प्रवाशांच्या सोयीसाठी किमान पत्र्याची कायमस्वरुपी शेड उभारणे, सुलभ शौचालये व अन्य सुविधाअभावी महिला प्रवाशांची होत असलेली गैरसोय लक्षात घेंता तेथे सुलभ शौचालय व अन्य अत्यावश्यक सोयीसुविधा उपलब्ध करण्याकरिता राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद राज्य शासनास करीत आहे. ''

(७४) '' सह्याद्री पर्वतराजीत दरवर्षी सुमारे ४००० मिलीमीटर पाऊस पडतो, त्यापैकी बहुतांशी पाणी अरबी सागरात वाहून जाते. सह्याद्री पर्वतावर कोकण बाजूने समुद्र सपाटीपासून ५०० ते ६०० मीटर उंचीवर कोल्हापूरपासून धुळे पर्यंत ६०० कि.मी. लांबीचा समतल कालवा खोदून पडणाऱ्या पावसाचे पाणी बोगद्यातून पर्वताच्या पूर्वेकडील नद्यांमध्ये सोडल्यास राज्यातील दुष्काळी भागासाठी ५३० दशलक्ष घनमीटर (टीएमसी) पेक्षा जास्त पाणी कायमस्वरुपी उपलब्ध होईल. तसेच या प्रकल्पामध्ये वीज निर्मितीही होऊन निसर्गाची किंचित नासाडी न करता समग्र पर्यावरण संपदा जपणाऱ्या या योजनेत विस्थापन होणार नाही. तसेच लोखंड व सिमेंटचा अतिरेक होणार नाही. या जलसंजीवनी प्रकल्पामुळे महाराष्ट्रातील पाणी समस्येवर कायमस्वरुपी तोडगा निघणार असल्याने तसेच ह्या जलसंजीवनी योजनेचा देशातील नद्याजोड प्रकल्पामध्ये समावेश केल्याने महाराष्ट्राचा असलेला अनुशेष दूर होणार असल्याने, या जलसंजीवनी योजनेचा समावेश देशातील नद्याजोड प्रकल्पामध्ये करण्यात यावा अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७५) '' जीवनावश्यक वस्तुंचे कडाडलेले भाव लक्षात घेता राज्यातील जनतेला शिधावाटप दुकानांतून रास्त भावाने व योग्य प्रमाणात अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तुंचा नियमित पुरवठा होण्याचे दृष्टीने सध्या कार्यरत असलेली यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७६) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगाराअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तीला रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

## श्री.विक्रम काळे यांचा ठराव क्रमांक ७९, ८० व ८२

(७९) ''महाराष्ट्र राज्य हे शेती उद्योगात अग्रेसर असल्यामुळे शेतकऱ्यांना शेतीमाल उत्पादन करण्यासाठी सतत वाढत असलेला उत्पादन खर्च लक्षात घेता शेतकऱ्यांना शेती उत्पादन करण्यासाठी अल्पदरात कर्ज पुरवठा करण्यासंदर्भात उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

(८०) '' शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा वा महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत दिली जाते त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील पाल्यांना शाळा वा महाविद्यालयांमार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत देण्यांत यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८२) " राज्यातील ग्रामीण भागातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची संख्या वाढविण्यापेक्षा उपलब्ध असलेल्या शाळांमधून गुणात्मक व दर्जेदार शिक्षण विद्यार्थ्यांना मिळण्यासाठी ठासे कृती कार्यक्रम व त्याची कालबध्द अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

## श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील यांचा ठराव क्रमांक ८८,८९,९०,९१

(८८) " राज्यात तालुक्याच्या ठिकाणी सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत, जेणेकरुन तालुक्याच्या ठिकाणी येणा-या ग्रामीण भागातील जनतेला त्यांच्या कामासाठी वेगवेगळया कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही, तसेच आर्थिक भुर्दंड सोसावा लागणार नाही, यासाठी शासनाने योजनाबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(८९) " जीवनावश्यक वस्तुंचे कडाडलेले भाव लक्षात घेता राज्यातील जनतेला शिधावाटप दुकानांतून रास्त भावाने व योग्य प्रमाणात अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तुंचा नियमित पुरवठा होण्याचे दृष्टीने सध्या कार्यरत असलेली यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(९०) " राज्यातील दूरदर्शन तसेच केबल नेटवर्कद्वारा प्रसारित होणाऱ्या विविध चॅनेलद्वारा अश्लील व हिंसाचारी चित्रपट, जाहिराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जातात, परिणामी तरुणपिढीवर व बालमनावर त्यांचे होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या सर्व वाहिन्यांवरील अश्लील कार्यक्रमांवर

बंदी घालावी  यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(९१) " ग्रामीण महिलांकरिता स्वच्छता गृहाची सोय होण्याच्या दृष्टीने प्रत्येक गावात महिलांसाठी किमान प्रत्येक वार्डामध्ये एक स्वतंत्र सुलभ शौचालय बांधण्यात यावीत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

## डॉ. वसंत पवार यांचा ठराव क्रमांक ९३,९४,९५

(९३) "राज्यात तालुक्याच्या ठिकाणी सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत, जेणेकरुन तालुक्याच्या ठिकाणी येणा-या ग्रामीण भागातील जनतेला त्यांच्या कामासाठी वेगवेगळया कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही, तसेच आर्थिक भुर्दंड  सोसावा लागणार नाही, यासाठी शासनाने योजनाबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(९४) "राज्यात दिवसेंदिवस जमिनीवरील व भूगर्भातील पाण्याची पातळी वेगाने कमी होत असल्याने व त्यातच पावसाचे प्रमाण देखील कमी होत असल्यामुळे पिण्याच्या पाण्याचा व शेतीच्या पाण्याचा दिवसेंदिवस ज्वलंत होत चाललेला प्रश्न लक्षात घेता जलसंधारणाचा कार्यक्रम प्रभावीरित्या राबविण्याच्या दृष्टीने शासनाने कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(९५) " राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करुन अध्ययन करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारिरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने हया विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने सर्वकष उपाययोजना करुन या विद्यार्थ्यांचे जीवनमान उंचाविण्याकरिता कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

## श्री. सुभाष चव्हाण  यांचा ठराव क्रमांक ९६,९७,९८,९९,१००

(९६) " राज्यातील बहुसंख्य गावात विशेषतः उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(९७) "कोकणातील भुभागापैकी सुमारे ५३.४५ टक्के पडित असलेल्या जमिनीत आंबा, काजू, सुपारी, कोकम, नारळ इ.फळांची लागवड आणि साग, शिसम, आईन, किंजळ, खैर इ.वृक्षांची वनराईची पध्दतशीर लागवड करण्याच्या दृष्टीने धडक कार्यक्रम हाती घेऊन या कार्यक्रमासाठी आर्थिक तरतूद व अन्य उपाययोजना करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(९८) "पूर, गारपीट या सारख्या नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून देण्यात येणारी रुपये १००० ची मदत अतिशय अपुरी असल्यामुळे व ती देताना सुध्दा २ हेक्टर पर्यंतची कमाल मर्यादा असल्यामुळे नैसर्गिक आपत्तीत सापडणाऱ्या शेतकऱ्यांच्या डोक्यावर कायमची असणारी असुरक्षितता दूर करण्यासाठी शासनाने मदतीची मर्यादा रुपये २००० पर्यंत वाढवावी व त्यासाठी ठरविण्यात आलेली २ हेक्टरची कमाल मर्यादा हटविण्यात यावी अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे."

(९९) "राज्यातील सर्व गावे बारमाही वाहतूकीस योग्य होण्यासाठी सर्व ग्रामीण भागातील रस्त्यांची पाहणी करुन आवश्यक असेल तेथे नद्या, नाले व मो-या यांचेवर पूल बांधण्याची धडक योजना अंमलात आणावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. "

(१००) "राज्यातील ग्रामीण भागातील सर्व खेडी नजिकच्या महामार्गांना डांबरी रस्त्याने जोडण्यासाठी शासनाने एक कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**एकोणीस** : सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली कागदपत्रे (यादी सोबत जोडण्यांत आली आहे.)

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : मार्च, २०१०.

**अनंत कळसे,**
प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानपरिषद.